# सर्वसाधारण सभा

दि. ०३/०४/२०२२ वार : रविवार
ठिकाण:-प्रधान कार्यालय, मॉडेल कॉलनी,पुणे
वेळ:- दुपारी २:३० वाजता.

**उपस्थिति:-**

| | | |
|---|---|---|
| १. श्री.अशोकजी राठी | २.श्री.नंदकिशोरजी राठी | ३.श्री.जुगलकिशोरजी मुंदडा |
| ४. श्री.मनोहरजी माहेश्वरी | ५.श्री.रामकुमारजी राठी | ६.सौ.सुशिलाजी राठी |
| ७. श्री.शेखरजी मुंदडा | ८.श्री.माणकचंदजी काबरा | ९.श्री.व्रजेन्द्रजी मालू |
| १०.श्री.रतनजी राठी | ११.श्री.नंदकिशोरजी काबरा | १२.श्री.अशिषजी कासट |
| १३.श्री.सुरेशजी नावंदर | १४.श्री.मिश्रीलालजी झंवर | १५.श्री.वसंतलालजी चांडक |
| १६.श्री.दिलीपजी कासट | १७.श्री.रमेशजी काबरा | १८.श्री.निलेशजी लाहोटी |
| १९.श्री.विठ्ठलजी मणियार | २०.श्री.ओमप्रकाशजी लोया | २१.श्री.शामसुंदरजी चांडक |
| २२.श्री.अशोकजी लड्डा | २३.श्री.प्रविणजी भनसाळी | २४.श्री.मनिषजी भट्टड |
| २५.श्री.मनिषजी झंवर | २६.श्री.लक्ष्मीनारायणजी मुंदडा | २७.श्री.सत्यनारायणजी सारडा |
| २८.श्री.राजेंद्रजी मंत्री | २९.श्री.मधुसुदनजी सारडा | ३०.श्री.रमणलालजी करवा |
| ३१.श्री.राजेंद्रजी डागा | ३२.श्री.मनोजजी कासट | ३३.श्री.ओमप्रकाशजी सोमाणी |
| ३४.श्री.गिरीधारीजी भुतडा | ३५.श्री.गोविंदजी लाहोटी | ३६.श्री.लक्ष्मीकांतजी नावंदर |
| ३७.श्री.राजेंद्रजी आसावा | ३८.श्री.मनोजजी जाजु | ३९.श्री.गोकुळजी लाहोटी |
| ४०.श्री.सुनिलजी भुतडा | ४१.श्री.शरदजी झंवर | ४२.श्री.राजेंद्रजी सारडा |
| ४३.श्री.लक्ष्मीकांतजी झंवर | ४४.श्री.रामप्रसादजी राठी | ४५.श्री.सुभाषजी लोहिया |
| ४६.श्री.दिपकजी काबरा | ४७.श्री.महेशजी मालपाणी | ४८.श्री.मनिषजी कासट |
| ४९.श्री.विनोदजी करवा | ५०.श्री.अमोलजी गो.मर्दा | ५१.श्री.अनुपजी बियाणी |
| ५२.श्री.अमोलजी करवा | ५३.श्री.कैलासजी सिकची | ५४.श्री.कैलासजी शरदजी नावंदर |
| ५५.श्री.योगेशजी बजाज | ५६.श्री.सुमितजी भंडारी | ५७.श्री.रविकांतजी काबरा |
| ५८.श्री.श्रीकांतजी लखोटिया | ५९.श्री.जुगलकिशोरजी पुंगलिया | ६०.श्री.संजयजी बिहाणी |
| ६१.श्री.शामसुंदरजी कलंत्री | ६२.श्री.गोपालजी लोया | ६३.श्री.गोविंदजी मुंदडा |
| ६४.श्री.सचिनजी प्र.मंत्री | ६५.श्री.बालकृष्णजी करवा | ६६.श्री.अमितजी राठी |
| ६७.श्री.मनोजजी झंवर | ६८.श्री,दिनेशजी राठी | ६९.श्री.अश्विनजी चांडक |
| ७०.श्री.लक्ष्मीकांतजी सोमाणी | ७१.श्री.जवाहरजी जाखोटिया | ७२.श्री.धिरजजी पुंगलिया |
| ७३.श्री.सुनिलजी माहेश्वरी | ७४.श्री.बलदावा | ७५.श्री.अनिलजी बिदादा |
| ७६.श्री.निर्मलजी तोष्णीवाल | ७७.श्री.अमोलजी भट्टड | ७८.श्री.सचिनजी दरक |
| ७९.श्री.संजयजी झंवर | ८०.श्री.दिपकजी मुंदडा | ८१.श्री.राहुलजी बुब |
| ८२.श्री.निखीलजी कंलत्री | ८३.श्री.कृष्णाजी लखोटिया | ८४.श्री.विष्णुकांतजी मानधन्या |
| ८५.श्री.संजयजी डागा | ८६.श्री.नंदकिशोरजी भराडिया | ८७.श्री.नयनजी नोगजा |
| ८८.श्री.धिरजजी राठी | ८९.श्री.पियुषजी भट्टड | ९०.श्री.निलेशजी भट्टड |
| ९१.श्री.आशिषजी बिहाणी | ९२.श्री.दर्शनजी मुंदडा | ९३.श्री.प्रितमजी करवा |
| ९४.श्री.बालाप्रसादजी बजाज | ९५.श्री.आनंदजी माहेश्वरी | ९६.श्री.जवाहरजी बाहेती |
| ९७.श्री.सचिनजी भट्टड | ९८.श्री.आनंदजी भंडारी | ९९.श्री.योगेशजी बियाणी |

| | | |
|---|---|---|
| १००.श्री.प्रमोदजी भुतडा | १०१.श्री.उज्वलजी तापडिया | १०२.श्रीमती विद्याजी बांगड |
| १०३.सौ.निर्मलाजी करवा | १०४.सौ.सुजाताजी मुंदडा | १०५.श्रीमती.कांताजी काबरा |
| १०६.सौ.अंजलीजी राठी | १०७.सौ.सुर्यकांताजी मानधने | १०८.सौ.नंदाजी बांगड |
| १०९.सौ.स्नेहलताजी लोया | ११०.सौ.पुष्पाजी राठी | १११.श्रीमती संतोषजी तापडिया |
| ११२.सौ.लताजी काबरा | ११३.सौ.कमलजी सोनी | ११४.सौ.प्रतिभाजी काबरा |
| ११५.सौ.शोभाजी सारडा | ११६.सौ.श्वेताजी मंत्री | ११७.सौ.शितलजी नावंदर |
| ११८.सौ.स्वातीजी मुंदडा | ११९.सौ.स्मिताजी मालपाणी | १२०.श्रीमती शामलजी तोष्णीवाल |
| १२१.सौ.नम्रताजी जाजु | १२२.सौ.संगिताजी लाहोटी | १२३.श्रीमती सावित्राजी मुंदडा |
| १२४.सौ.शिलाजी जाजु | १२५.सौ.अर्चनाजी लोहिया | १२६.सौ.सुनंदाजी राठी |
| १२७.सौ.लताजी लाहोटी | १२८.श्रीमती निर्मलाजी लाहोटी | १२९.श्रीमती मालाजी चांडक |
| १३०.सौ.चंचलजी माहेश्वरी | १३१.श्री.गणेशजी मुंदडा | १३२.श्री.लक्ष्मीकांतजी मणियार |
| १३३.श्री.सचिनजी मालपाणी | १३४.श्री.शिवप्रसादजी मंत्री | १३५.श्री.सुशिलकुमारजी राठी |
| १३६.श्री.रमेशजी लाहोटी | १३७.श्री.भवरलालजी पुंगलिया | १३८.श्री.ओमप्रकाशजी कासट |
| १३९.श्री.आकाशजी दहाड | १४०.श्री.संदिपजी माहेश्वरी | १४१.श्री.मुरलीधरजी सारडा |
| १४२.सौ.स्नेहलताजी धूत | १४३.श्री.पुरूषोत्तमजी लोहिया | १४४.श्री.विकासजी मुंदडा |
| १४५.सौ.मिनाक्षीजी सारडा | १४६.श्री.राहुलजी धूत | १४७.श्री.वैभवजी पनपालिया |
| १४८.श्री.अश्विनजी हेडा | १४९.श्री.संजयजी जाखोटिया | १५०.श्री.संतोषजी राठी |
| १५१.श्री.अतुलजी लाहोटी | १५२.श्री.रमेशजी धूत | १५३.श्री.नंदकिशोरजी मालाणी |
| १५४.श्री.जयप्रकाशजी सोनी | १५५.श्री.गोविंदजी मुंदडा | |

मंडळाची सर्वसाधारण सभा वरील सदस्यांच्या उपस्थितीत सुरू करण्यात आली. मंडळाच्या सचिव सौ.सुशिलाजी राठी यांनी सर्वांचे स्वागत करून पदाधिका-यांना आपण काम करण्याची संधी दिली त्याबद्दल आभार प्रकट केले व सभेचे अध्यक्षस्थान मंडळाचे अध्यक्ष श्री.अतुलजी लाहोटी यांनी स्वीकारण्याची विनंती केली. येणेप्रमाणे श्री.अतुलजी लाहोटी यांनी सभेचे अध्यक्षस्थान स्वीकारले. यानंतर मागील कार्यकाळात संस्थेचे कार्यकर्ते, दानदाते व सदस्य यांचे निधन झाले. त्यांना श्रध्दांजली अर्पण करण्यात आली. यानंतर सभेचे कामकाज सुरू करणात आले.

सभाध्यक्ष श्री.अतुलजी लाहोटी यांनी मंडळाच्या सर्वसाधारण सभेमध्ये उपस्थित सदस्यांचे स्वागत केले. मंडळाकडून मागील कार्यकाळात झालेल्या सर्व कामाचा घोषवारा व माहिती सर्वसाधारण सभेत पदाधिकारी देत असतात व सभेतील सदस्यांच्या सुचना लक्षात घेऊन पुढील कार्य केले जाते. कोरोनामुळे मागील दोन सर्वसाधारण सभा होऊ शकल्या नाहीत त्यामुळे पदाधिका-यांना व कार्यकर्त्यांना जास्त काळ काम करण्याची संधी मिळाली. त्या कार्यकाळात जी अनेक कामे केली गेली त्याचे श्रेय केवळ पदाधिका-यांचे नसुन स्थानिय समित्यांचे व कार्यकर्त्यांचे, दानदात्यांचे आहे. विश्वस्तांनी पदाधिका-यांवर दाखविलेला विश्वास तसेच प्रबंधकारिणीने दिलेल्या दिशेच्या बळावर अशी कामे केली जातात व केली गेली आहेत त्याचा लेखाजोखा प्रेझेन्टेशनच्या माध्यमातून सभेसमोर ठेवतो आहे.

- कार्यकर्ता मंडळाचा आत्मा असतो त्याच्या बळावर अनेकानेक प्रकल्प, उपक्रम मंडळ राबवित असते असे सक्रिय कार्यकर्ते मंडळाला मोठ्या प्रमाणावर जोडण्यात आले.
- वि.ना.लाहोटी विद्यार्थी भवनाचे पुर्नविकासाचे काम सुरू असुन तापडिया व मालपाणी टॉवरचे काम पुर्ण झाले आहे. याच्यात १८९ विद्यार्थी क्षमता आहे. पुढील सहा महिन्यात करवा व बुब टॉवरचे काम होईल. एकुण ३०० विद्यार्थ्यांची क्षमता येथे होईल. कोरोना काळात देखील या प्रकल्पाचे काम सुरू होते. श्री.लक्ष्मीकांतजी नावंदर या प्रकल्पाचे चेअरमन आहेत. त्यांच्या देखरेखीत हे काम सुरू आहे.
- ऐरोली प्रकल्पाचे ७५% काम पुर्ण झाले असून सिडकोने वाढीव FSI ऑफर केला असुन आपल्याला वाढीव दोन मजले मिळणार आहेत. एकुण सात मजल्याची इमारत होईल. येत्या मार्च महिन्यामध्ये हा प्रकल्प पुर्ण

होईल. १२६ मुलींची व्यवस्था याठिकाणी होईल. या प्रकल्पासाठी दानदाते मंडाळाला जुळले. हे मोठे काम करताना श्री.माणकचंदजी काबरा, श्री.वसंतलालजी चांडक, श्री.जुगलकिशोरजी मुंदडा, श्री.मिश्रीलालजी झंवर या कार्यकर्त्यांनी खुप मेहनत घेतली.

- सोनी महाविद्यालयात वाढीव एक मजल्याचे काम करण्यात आले आहे. मल्टीपर्पज हॉल, स्टाफ रूम, क्लास रूम, लायब्ररी, कॅाम्पुटर लॅब, कॅान्फरन्स रूम अशा सुविधा उपलब्ध करून देण्यात आलेल्या आहेत. सोलापूर कार्यकर्त्यांचे डिव्होशन आपणा सगळ्यांना ज्ञात आहेच. अत्यंत कमी कालावधी मध्ये या मजल्याचे काम केलेले आहे.
- Hostels in collaboration ही नविन संकल्पना आमलात आणली. याच्यात आपले विश्वस्त श्री.पुरूषोत्तमजी लोहिया यांनी वसतिगृहासाठी जागा घेऊन आपल्या पध्दतीने मुलींचे वसतिगृह बांधून देत असुन याचे व्यवस्थापन मंडळाकडून केले जाईल. वसतिगृह चालविण्यात मंडळाचा हातखंडा आहे. ११० क्षमतेचे हे वसतिगृह असणार. येत्या जानेवारीत हे काम पुर्ण होईल. श्री.दर्शनजी मुंदडा हे काम करत आहेत.

- मंडळ जरी शैक्षणिक क्षेत्रात काम करत असेल तरी सामाजीक बांधिलकी नेहमी जोपासत असते. कोरोना काळात पहिल्या व दुस-या लाटेत खुप चांगले काम मंडळाने केले आहे. जवळ जवळ ५५००० टिफीन कोरोना पिडित परिवारांना तसेच गोरगरीब, पोलिस, कोरोना वॅारिअर्स अशांना वितरित केले. व्हॅक्सीनेशन कॅम्प राबविला १६०० लोकांना व्हॅक्सीनेट करण्यात आले. ६ ऑक्सीजन कॅान्सन्ट्रेटर उपलब्ध करून देण्यात आले तसेच महेश सांस्कृतिक भवनमध्ये  निर्माण करण्यात आलेल्या कोविड सेंटर मध्ये अॅडमिट असलेले २४ पेशंटना आवश्यकतेनुसार आर्थिक मदत करण्यात आली.

- कोरोना काळात वेगवेगळ्या टॅापीकवर २८ वेबीनार्स स्कॅालर समिती कडून घेण्यात आले. याव्दारे मंडळाचे नाव घराघरात पोहचवण्यास मदत झाली व समाज उद्‌बोधन करण्याचे काम याव्दारे करण्यात आले. यासाठी मुंबईचे श्री.व्रजेंद्रजी मालू यांनी चांगली मेहनत घेतली.

- कोरोनामुळे अनेक विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान तर झालेच परंतू यात अनेक विद्यार्थ्यांच्या  आई/वडिल / नातेवाईक यांचे निधन झाले. यासंदर्भात सामाजिक बांधिलकी जोपासत मंडळ संचलित सोलापूर, पुणे येथिल शाळांच्या शुल्कात  सवलत देऊन एकूण रू.१२७ लाखांची सवलत देऊन त्यांचे शिक्षण सुरू ठेवण्यात मदत केली.

- मागील २ वर्षापासून कोरोनामुळे सगळयांच क्षेत्रामध्ये मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे, जिवित हानी झाली आहे. याकाळात मंडळाचे प्रकल्प सुरू होते. स्कॅालरशिप देण्यात आल्या/ शाळांच्या शुल्कामध्ये सवलती देण्यात आल्या. तरी देखील मागील वर्षी रू.१७४ लाख सरप्लस आहे. कॅपीटल खर्चात कुठलीच कमी न करता ऐवढा सरप्लस आहे.

- वि.ना.लाहोटी व हि.रा.राठी विद्यार्थी भवनामध्ये AC व अत्याधुनिक अभ्यासिका तयार करण्यात आल्या. तसेच रा.ब.ह.रा.राठी व हि.रा.राठी वि.भवनाच्या टेरेस विकसित करण्यात आल्या.

- स्वावलंबन योजना/ स्कॅालरशिप वितरण / असाहय व्यक्ति सहाय्यतेचे काम सुरू आहे. स्वावलंबन योजनेत आतापर्यंत ३६ विद्यार्थ्यांना घडविण्यात आले आहे.

- ग्रीन ईनिशिऐटिव्ह अंतर्गत आपण पेपरलेस ऑफीस तसेच वसतिगृह तसेच शाळांच्या इमारतीवर १२५ kw एनर्जी सोलर प्लंट तयार केलेले आहेत. याच्यामुळे मोठ्या प्रमाणावर सेविंग्ज् होत आहे. मंडळाचे ९०% काम हे डिजीटल माध्यमांतुन होत आहे.

- CSR Donation च्या अंतर्गत मोठ्या प्रमाणात दानदाते मंडळाला जुळले आहेत. शासनाकडून संस्थांचे CSR साठीचे रजिस्ट्रेशन काढून घेण्यात आले आहेत. परंतू आपला योग्य पाठपुरावा असल्याने आपले सर्टीफीकेट अबाधित आहे. तसेच CSR Donation साठी मंडळ सदैव प्रयत्न करीत आहे.

- लॅपटॉप डिस्ट्रिब्युशन :- श्री.मुकुंद भवन ट्रस्टच्या वतीने माहेश्वरी विद्या प्रचारक मंडळातर्फे समाजातील गरीब व होतकरू विद्यार्थ्यांना १०० लॅपटॉप वितरित करण्यात आले.

- मंडळाचे कार्य बघून न्याती परिवार (श्री.नितीनजी न्याती ) यांनी मंडळाच्या मुख्य इमारतीला नाव देण्यासाठी रू.२.५ करोड देण्याचे आश्वासन दिले त्यातील रू.१.११ करोड त्यांनी दिलेले आहे.

- मंडळाने दिर्घ मुदतीने भाडेतत्वावर वसतिगृह घेतली आहेत. कोरोनाकाळात सदर वसतिगृह अत्यल्प प्रमाणात सुरू होती. वसतिगृहाला फिक्स रेंट असते परंतू वसतिगृह इमारत मालकांशी बोलून विनंती करून रेंटमध्ये सरासरी ४०% सवलत आपण मिळविली.

- समाजातील विद्यार्थ्यांना शैक्षणिक अभ्यासक्रमा व्यतिरिक्त इतर स्कीलसेटस् देण्यासाठी MVPM Career Centre चे निर्माण मंडळाच्या मुख्य इमारतीच्या चौथ्या मजल्यावर करण्यात आले आहे. याठिकाणी द्रोणालया या उपक्रमांअंतर्गत विविध स्कीलस् विद्यार्थ्यांना दिले जातील. यासाठी विविध क्षेत्रात निष्णात असलेले Patron Member आपल्याला मिळाले आहेत. जे विद्यार्थी कोर्ससाठी येतिल त्यांची राहण्याची व्यवस्था / ट्रेनिंग, इंडस्ट्रीयल व्हिजीटस् करून वेगवेगळया टेक्नीक्स शिकविल्या जातील. गेल्या महिन्यात याठिकाणी सीए सेमिनार देखील घेण्यात आले. नुकतेच सीए झालेले तसे शिकणा-या विद्यार्थ्यांसाठी हे सेमिनार होते. याच्यात अत्यंत एक्सपर्ट मान्यवरांचे मार्गदर्शन विद्यार्थ्यांना मिळाले.

- कोरोना काळात मंडळाच्या सर्व शाळा, महाविद्यालय ऑनलाईन पध्दतीने सुरू होत्या तरी देखील सर्व शाळांचे निकाल १००% असून ९०% पेक्षा जास्त मुलांना ८०% शाळा समित्यांचे आभिनंदन की त्यांनी इतके उत्कृष्ठ काम या कार्यकाळात केले. महाविद्यालयातील CET, NEET, JEE Mains अशा परिक्षामध्ये विद्यार्थ्यांनी यश मिळविले. तसेच मंडल संचलित वसतिगृहामधील २६ विद्यार्थी CA झाले.

- Crowd Funding योजना सुरू करत आहोत. FCRA अंतर्गत विदेशातील समाज बांधवांकडून डोनेशन घेऊन रू.५ लाखापेक्षा जास्त रकमेची मदत पात्र विद्यार्थ्याला करण्यात येईल. याचे Evaluation आम्ही करणार यासाठी वेबसाईट बनविण्याचे काम सुरू आहे.

- महेश विद्यालय येथे पुणे म.न,पा कडून शाळे लगतची जागा जिथे इतर बांधकाम होऊ शकत नाही. व शाळा आरक्षित अशी ५२३ चौ.मि जागा दिर्घ मुदतीने भाडे तत्वावर घेण्यात येत असून पुढील दोन महिन्यात ही जागा ताब्यात येईल. यामुळे महेश विद्यालयाचे विस्तार करण्यात मदत होईल.

- Future Project :- सोलापूर येथे CBSE शाळा सुरू करणे, ल.ला.मुंदडा वि. भवन पुर्ननिर्माणाचे काम, कोथरूड कॅाम्प्लेक्स विकास, स्कील डेव्हलपमेंट सेंटर, मुख्य कार्यालय पुर्नविकासाचे काम पुढील ३ वर्षाच्या काळात हे काम करण्याचा मानस आहे.

मंडळाची सर्व कामे ही संपूर्ण समर्पणाने काम करणा-या स्थानिय समिती सदस्यांच्या मेहनतीने झाली आहे. विश्वस्तांच्या विश्वासाने तसेच मार्गदर्शनाने व प्रबंधकारिणीने व्हिजन ठेवून निश्चित केलेल्या ध्येय धोरणा तसेच मार्गदर्शनाने झालेली आहेत. सगळ्यात महत्वाचे दानदात्यांनी मंडळावर जो विश्वास दाखविला आहे. त्याच्या जोरावर मंडळाने ही झेप घेतली आहे. निश्चितच या सगळयांचा सपोर्ट पुढील काळात ही मिळेलच व मंडळाचा विकास दुपटीने होईल. ही मनोकामना व्यक्त करतो. यानंतर सभेला विषयानुरूप सुरूवात करण्यात आली.

**विषय क्र.१:- मंडल की सर्वसाधारण सभा दि.३०.०९.२०१९ तथा विशेष सर्वसाधारण सभा दि. २८.११.२०२१ ( तथा संविधान ) के इतिवृत्तांत को मंजूर करना ।**

मंडळाचे सचिव श्री.संतोषजी राठी यांनी सभेने सांगीतल्याप्रमाणे दोन्ही सभाचे ठराव सभेसमोर वाचले. सभेतुन इतिवृत्तांताबाबत दुरूस्त्या व सुचना आल्या नाहीत. येणेप्रमाणे सर्वसाधारण सभा दि. ३०.०९.१९ व विशेष सर्वसाधारण सभा दि. २८.११.२१ ( नया संविधान ) च्या इतिवृत्तांतास सर्वानुमते मंजुरी देण्यात आली.

सुचक :- श्री.जवाहरलालजी बाहेती
अनुमोदक :- श्री.लक्ष्मीकांतजी झंवर

**विषय क्र.२ :- मंडल की विशेष सर्वसाधारण सभा दि. २८.११.२१ को मंजुर किये गये नये संविधान के संदर्भ में अनुषंगिक प्रस्ताव पारित करना ।**

सभाध्यक्ष श्री.अतुलजी लाहोटी यांना सांगितले की, २८.११.२१ रोजी नविन घटने संदर्भात विशेष सर्वसाधारण सभा पार पडली त्या सभेमध्ये नविन घटना ठेवण्यात आली होती. त्यावर सभेमध्ये चर्चा झाली. सुचना आल्या त्यांचा विचार करून घटना अंतिम करण्याचा अधिकार मंडळाच्या पदाधिका-यांना देण्यात आला होता. त्या सुचनांचा विचार करून तसेच कायदेशीर सल्लागार ॲड.थावरेजी तसेच ॲड.माहेश्वरीजी यांच्याबरोबर बसून सुचविण्यात आलेल्या सुचनांना सामाविष्ठ करण्यात आल्या व नविन घटना अंतिम करण्यात आली.

आजपासून जुनी घटना रद्दबातल होईल व नविन घटना आमलात येईल. ती आमलात आणत असतांना आवश्यक अनुषंगिक ठराव असतात ते करणे गरजेचे असते म्हणून हा विषय घेण्यात आलेला आहे. यासंदर्भात संस्थेचे कायदेशीर सल्लागार ॲड.थावरे माहिती देतील.

**ॲड थावरे**- या विषयात अनुषंगीक शब्द वापरण्याचे कारण म्हणजे आपल्याला घटना पारित १ ला केल्यानंतर त्याचा बदल अर्ज तसेच मिस्लीनेस ॲप्लीकेशन मा.धर्मादाय आयुक्त कार्यालयात सादर करावा लागतो व अनुसूची १ ला त्याची नोंद करावी लागते. त्यासाठी एक विश्वस्ताच्या स्वाक्षरीने हे बदल अर्ज सादर केले जातात. त्याचे अधिकार सभेने द्यायला हवे आहेत याच्या बद्दलचे इतर अधिकार यामध्ये येतात.

श्री.अतुलजी लाहोटी यांनी सांगीतले की ॲड. माहेश्वरीजींनी यावर बरेच काम केले आहेत. त्यांनी नविन घटना आमलात आणण्यासाठीचा आवश्यक ठराव प्रस्तावित केलेला आहे. जो पारीत केल्यानंतर ही नविन घटना आमलात येईल. येणेप्रमाणे सभेत चर्चा झाली व नविन घटना आमलात आणण्यासाठी व त्याच्या अनुषंगीक ठराव खालील प्रमाणे करण्यात आले.

**ठराव क्र.** १:- आजच्या सर्वसाधारण सभेच्या विषय पत्रिकेतील विषय क्र. २ अनुसार दि. २८.११.२१ च्या विशेष सर्व साधारण सभेत मंजूर केलेली नविन घटना आजच्या सभेमध्ये पुनश्:च मंजुरीसाठी ठेवली असता आपण

सर्वांनी ती सर्वानुमते मंजूर केलेली आहे. नविन घटना आजपासून अंमलात आली आहे. या नविन घटनेतील अध्यक्ष व इतर पदांची ३ वर्षाकरिता करावयाची नविन घटनेप्रमाणेची निवड आपण मा.धर्मादाय आयुक्त यांचेपुढे दाखल करणा-या नविन घटनेच्या त्यांच्या संमतीच्या अधीन राहून हि निवड करीत आहोत. मा.धर्मादाय आयुक्त यांनी आपल्या नविन घटनेस संमती दिल्यानंतर व आजपासून निवडलेल्या पदाधिका-यांच्या कालावधी हा ३ वर्षाचा राहील.

सुचक :- ॲड मनोहरजी माहेश्वरी
अनुमोदक :- श्री.संजयजी झंवर, श्री.दिनेशजी राठी
ठराव :- सर्वानुमते मंजुर

**ठराव क्र. २**:- आजच्या सर्वसाधारण सभेमध्ये सर्व संमत करण्यात आलेल्या नविन घटनेबाबतचा बदल अर्ज दाखल करणे, वकील नेमणे त्याचे शुल्क ठरविणे, कागद पत्रांची पुर्तता करणे, लेखी व तोंडी पुरावा देणे, मा.धर्मादाय आयुक्त यांच्याकडे वेळोवेळी हजर राहणे. यासाठीचे अधिकार विषय क्र.६ प्रमाणे नियुक्त करण्यात येणारे नवनियुक्त विश्वस्त यापैकी दोघांना देण्यात यावे. याबाबतचा ठराव नवनियुक्त विश्वस्तांची पहिल्या बैठकीमध्ये विषय घेऊन करण्यात यावा असे आजची सर्वसाधारण सभा ठरवित आहे.

सुचक :- श्री.अशोकजी राठी
अनुमोदक :- श्री. गणेशजी मुंदडा
ठराव :- सर्वानुमते मंजुर

**विषय क्र.३ :- वर्ष २०१९-२०२० एवं २०२०- २०२१ के ऑडीटेड आय-व्यय पत्र तथा तुलन पत्रको स्वीकृती देना ।**

**विषय क्र. ४ :- वर्ष २०२१-२०२२ के वित्त संकल्प की जानकारी लेकर स्वीकृती देना ।**

**व**

**विषय क्र. ५ :- वर्ष २०२१-२२ एवं २०२२-२०२३ के हिसाब की जाँच के लिये लेखा परिक्षक की नियुक्ती एवं उनका पारिश्रमिक निश्चित करना ।**

मंडळाचे कोषाध्यक्ष श्री.संजयजी जाखोटीया यांनी सभेस माहिती दिली की, गेल्या २ वर्षापासून कोविड १९ या महामारीचा काळ असतांना देखील २०-२१ चा सरप्लस १.७४ कोटी ऐवढा आहे. याच्यात मंडळ संचलित शाळांचे समित्यांनी जे काम केलेले आहे त्यांचे आभिनंदन केले पाहिजे. त्यांनी पुढच्या वर्षात २.७८ कोटी शुल्क पालकांकडून जमा केले. वर्ष २०२०-२१ मधील आऊट स्टॅण्डींग शुल्क जमा केले. त्यामुळे बॅलन्सशीट प्रॉफीट मध्ये दिसत आहे. १.२७ कोटी रूपयांची सवलत आपण शाळा शुल्कात विद्यार्थ्यांना दिली. तसेच सभेपुढे बजेटची कॅापी वितरीत केली आहे. पुढील वर्षांचे खर्च लक्षात घेऊन सर्व बजेट करण्यात आले आहे. मंडळाचे लेखापरीक्षक श्री.एन.आर.काबरा याचे एन.आर काबरा ॲन्ड असोसिएटस् यांनी मागील वर्षीचे काम पाहिले.

सभेमध्ये वरील तिनही विषयी विस्तारित चर्चा करण्यात आली व खालील ठराव पारित करण्यात आले.

**विषय क्र.३ ठराव क्र.१** :- मंडळाच्या वर्ष २०१९-२०२० व २०२०-२०२१ च्या ऑडीटेड आय व्यय पत्र तसेच तुलन पत्रास आजची सर्वसाधारण सभा सर्वानुमते मंजूरी देत आहे.

सुचक :- श्री.रमेशजी काबरा
अनुमोदक :- श्री.गोविंदजी मुंदडा
ठराव :- सर्वानुमते मंजूर

**विषय क्र.४ ठराव क्र. १** :- मंडळाच्या वर्ष २०२१-२०२२ च्या वित्त संकल्पाची माहिती घेण्यात आली असून त्यास आजची सर्वसाधारण सभा सर्वानुमते मंजुरी देत आहे.

सुचक :- श्री.अमोलजी मर्दा
अनुमोदक :- श्री.राजेंद्रजी सारडा
ठराव :- सर्वानुमते मंजूर

**विषय क्र. ५ ठराव क्र.१** :- मंडळाच्या वर्ष २०२१-२०२२ व २०२२-२३ ऑडीट व हिशोब तपासणीसाठी लेखा परिक्षक म्हणून एन.आर काबरा कंपनी याची सर्वानुमते निवड करण्यात येत असुन मागील पारिश्रमीकामध्ये १०% वाढ करून त्याचे पारिश्रमीक निश्चित करण्यात येत आहे.

सुचक :- श्री.सचिनजी भट्टड
अनुमोदक :- श्री.आशिषजी कासट
ठराव :-सर्वानुमते मंजूर

**विषय क्र. ६ :- मंडल के अध्यक्ष, विश्वस्त (५), गव्हर्निंग कौन्सिल सदस्य (१७ ) एवं कार्यकारिणी सदस्योंका ( कुल आजीवन सदस्य संख्या के १५% अधितकम ) वर्ष २०२२-२०२५ ( तीन वर्ष ) के लिए चुनाव करना ( नयी संविधान अनुसार ) तथा कायम विश्वस्त २, एवं दानदाता विश्वस्त २ की जानकारी लेना ।**

सभा अध्यक्षांनी सभेला सांगीतले की, विषयातील पदांसाठी प्रस्तावित नावे असतील ते सुचवावीत.

डॉ.सुनंदाजी राठीः- माहेश्वरी विद्या प्रचारक मंडळाचे मोठे भाग्य मानावे लागेल की संस्थेवर प्रेम करणारे निस्वार्थ कार्यकर्ते, दानदाते, विद्यार्थी हितचिंतक आहेत. मागील कार्यकाळात जे विस्तारित कार्य पदाधिका-यांकडून केले गेले आहे. ज्याच्यामुळे मंडळाचे नाव साता समुद्रा पार गेलेले आहे. अशा कार्यकर्त्यांना अथक काम करू दिले पाहिजे. नविन संविधानात गव्हर्निंग कौन्सिल करून यात सदस्य संख्या वाढवण्यात आली आहे. कार्यकारिणी कायम करून नवनविन कार्यकर्ते मंडळाशी जोडले जात आहे. प्रत्येकाला संस्थेबरोबर काम करण्याची इच्छा आहे. त्यांना संधी या माध्यमातून दिली जाईल. मागील काळात श्री.अतुलजी लाहोटी यांच्या नेतृत्वात अनेक नविन उपक्रम सुरू करण्यात आले व त्यांचे व्यवस्थित व्यवस्थापन केले जात आहेत. विद्यार्थ्यांचे भवितव्य लक्षात घेऊन नवनविन योजना राबविल्या जात आहेत. प्रत्येक नवी कल्पना प्रत्यक्षात आमलात येत आहेत. त्यामुळे मंडळ प्रगती पथावर आहे. कारण संस्था स्वतः मध्ये बदल घडवून आणत आहे. म्हणजे त्याचे नेतृत्व व शिलेदार उत्कृष्ठ काम करत आहे. कोरोना काळात देखील मंडळाच्या कार्याची गती कमी झाली नाही. मंडळाचे प्रकल्प देखील याकाळात जोरात सुरू होते. सभेने या टीमचे अभिनंदन केले. यानंतर यांनी सांगीतले की, जे मागील कार्यकाळात जे काम झाले आहे ते बघून असे वाटते की, आहे ती टीम कायम करावी परंतू परिवर्तन होने आवश्यक असते म्हणून सभेपुढे खालील नावे विविध पदासाठी सभेसमोर ठेवत आहोत. प्रत्येक सदस्यांचे काम संस्थेसाठी केलेले काम व पुढील कामे करण्यासाठीची कमीटमेंट बघून नविन व जुने कार्यकर्त्यांचा समतोल करून या पदांसाठी अनुभवी लोकांनी प्रस्तावित केली आहोत. ती मंडळाचे सल्लागार श्री.रामकुमारजी राठी यांनी सभेसमोर ठेवावीत.

सभा अध्यक्ष श्री.अतुलजी लाहोटी यांनी श्री. रामकुमारजी राठी यांना प्रस्तावित नावे सांगण्याची विनंती केली

**श्री.रामकुमारजी राठी** - मागील दोन वर्ष कोरोनामुळे सर्वसाधारण सभा घेता आली नाही. त्यामुळे स्वाभाविकच पदाधिका-यांना दोन वर्ष संस्थेसाठी जास्त काम करण्याची संधी मिळाली. त्यांनीही चांगले काम या काळात केले. श्री.अतुलजी लाहोटी व टीम ते उत्कृष्ठ काम केलेले आहे. मंडळाची नविन घटना मी वाचली त्यानुसार कुठलाही पदाधिकारी जास्तीत जास्त २ टर्म काम करू शकतो. परंतु सर्वसाधारण सभा एक टर्म वाढवू शकते. मंडळाच्या विविध पदांसाठी खालील प्रमाणे नावे प्रस्तावित करत आहेत त्यात अतुलजी लाहोटी हे अध्यक्ष यांनी अतिशय उत्तम कार्य त्यांच्या कार्यकाळात केलेले आहे. अनेक मोठे प्रकल्प त्यांनी हाती घेतलेले आहेत. काही प्रकल्प सुरू आहेत. ते तन,मन धनाने संस्थेशी जुळलेले आहेत. पुढे ही त्यांना खुप काम करायचे आहे. म्हणून त्यांची कामगीरी बघून पुढील

कार्यकाळासाठी अध्यक्षपदावर कायम करावे. नविन घटनेच्या सर्वसामान्य नियमावलीतील कलम एफ प्रमाणे सर्वसाधारण सभेला एक टर्म वाढविण्याचे अधिकार आहेत. यानंतर सभेने एकमताने संमती दिली येणेप्रमाणे खालील ठराव पारित करण्यात आला.

**ठराव क्र.१**:- मंडळाचे सध्याचे अध्यक्ष श्री.अतुलजी लाहोटी यांना २ टर्म पूर्ण होत असुन त्यांनी त्यांच्या कार्यकाळात तन,मन,धनाने कार्य करून संस्थेस नवी दिशा दिलेली आहे. त्यांच्या कार्यकाळात अनेक उपक्रम राबविण्यात आले. अनेक प्रकल्प करण्यात आले. काही प्रकल्प सुरू आहेत. त्यांचे कार्य विशेष असुन त्यांना पुढील ३ वर्षाच्या कार्यकाळासाठी अध्यक्षपदावर कायम करण्यात येत आहे.

सुचक :- श्री.रामकुमारजी राठी
अनुमोदक :- सौ.लताजी काबरा, श्रीमती संतोषजी तापाडिया,
श्री. योगेशजी बियाणी, श्री.नयनजी नोगजा
ठराव :- सर्वानुमते मंजूर

यानंतर श्री.रामकुमारजी राठी यांनी खालील नावे प्रस्तावित केली.

**अध्यक्ष** :- श्री.अतुलजी लाहोटी,पुणे
**विश्वस्त (कायम विश्वस्त)** :- श्री.जुगलकिशोरजी मुंदडा, ठाणे श्री.नंदकिशोरजी राठी, पुणे

**इतर ५ विश्वस्त**:- श्री पुरूषोत्तमजी लोहिया, पुणे. श्रीमती सावित्राजी मुंदडा, पुणे. श्री.रमेशजी धूत, पुणे. श्री.माणकचंदजी काबरा, मुंबई. श्री श्रीकांतजी लखोटीया, पुणे

**गव्हर्निंग कौन्सील** :-
सौ.सुशिलाजी राठी, पुणे. सौ.प्रतिभाजी काबरा, पुणे. सौ.मालतीजी चांडक, पुणे. श्री.शेखरजी मुंदडा, पुणे. श्री.अश्विनजी चांडक, पुणे. श्री.अमोलजी भट्टड, पुणे. श्री.बालकृष्णजी करवा, पुणे. श्री.जुगलकिशोरजी पुंगलिया, पुणे. श्री.लक्ष्मीकांतजी नावंदर, पुणे. श्री.संजयजी जाखोटिया, पुणे. श्री.शैलेशजी मालू, पुणे. श्री.मनिषजी कासट, पुणे. श्री.व्रजेंद्रजी मालु, मुंबई. श्री.मधुसुदनजी सारडा, अहमदनगर. श्री.गिरीधारीजी भुतडा, सोलापूर. श्री.ओमप्रकाशजी सोमाणी, सोलापूर. श्री.वेणुगोपालजी तापडिया, सोलापूर.

वरील प्रस्तावित नावांवर सभेत विस्तारीत चर्चा करण्यात आली व खालील ठराव पारित करण्यात आला.

**ठराव क्र.२** - मंडळाच्या वर्ष २०२२ ते २०२५ या कार्यकाळासाठी खालील नावांना व त्यांच्या पदांना आजची सर्वसाधारण सभा सर्वानुमते मंजुरी देत आहे.
**अध्यक्ष** :- श्री.अतुलजी लाहोटी, पुणे
**विश्वस्त (कायम विश्वस्त)** :- श्री.जुगलकिशोरजी मुंदडा, ठाणे. श्री.नंदकिशोरजी राठी, पुणे.
**इतर ५ विश्वस्त**:- श्री.पुरूषोत्तमजी लोहिया, पुणे. श्रीमती.सावित्राजी मुंदडा, पुणे. श्री.रमेशजी धूत, पुणे. श्री.माणकचंदजी काबरा, मुंबई. श्री. श्रीकांतजी लखोटीया, पुणे.

**गव्हर्निंग कौन्सील** :-
सौ.सुशिलाजी राठी, पुणे. सौ.प्रतिभाजी काबरा, पुणे. सौ.मालतीजी चांडक, पुणे. श्री.शेखरजी मुंदडा, पुणे. श्री.अश्विनजी चांडक, पुणे. श्री.अमोलजी भट्टड, पुणे. श्री.बालकृष्णजी करवा, पुणे. श्री.जुगलकिशोरजी पुंगलिया, पुणे. श्री.लक्ष्मीकांतजी नावंदर, पुणे. श्री.संजयजी जाखोटिया, पुणे. श्री.शैलेशजी मालू, पुणे. श्री.मनिषजी कासट, पुणे. श्री.व्रजेंद्रजी मालु, मुंबई. श्री.मधुसुदनजी सारडा, अहमदनगर. श्री.गिरीधारीजी भुतडा, सोलापूर. श्री.ओमप्रकाशजी सोमाणी, सोलापूर. श्री.वेणुगोपालजी तापडिया, सोलापूर.

सुचक :- सौ.सुनंदाजी राठी, सौ.लताजी काबरा
अनुमोदक :- श्री.बज़रंगजी लोहिया, श्री.अशोकजी राठी, श्री.योगेशजी बजाज, श्री.गोविंदजी मुंदडा
ठराव :- सर्वानुमते मंजुर

नवनियुक्त अध्यक्ष श्री.अतुलजी लाहोटी यांनी सभेला संबोधित करतांना धन्यवाद प्रेषित केला व येणा-या काळात उत्तमोत्तम काम करण्याचे आश्वासन दिले. यानंतर त्यांनी सांगीतले की, श्री.रामकुमारजी राठी यांनी प्रस्तावित केलेल्या समतोल टीम ला आपण एकमताने संमती दर्शविली त्याबद्दल आभार.

नविन घटने अनुसार मंडळाचे कार्याध्यक्ष (१), सचिव (२), कोषाध्यक्ष (१), उपाध्यक्ष (४) याची निवड अध्यक्ष करतील. त्याच्यात मंडळाचे अध्यक्ष श्री.अतुलजी लाहोटी यांनी सभेस निवेदन केले की, सौ.सुशिलाजी राठी यांना संस्थेच्या कामांबाबत प्रदीर्घ अनुभव आहे. त्यांना नविन घटनेच्या सर्वसाधारण नियमावली मधील कलम एफ नुसार एक टर्म वाढवून द्यावी. सभेने त्यांना पुढील कार्यकाळासाठी संमती द्यावी व श्री. अमोलजी भट्टड हे मंडळाशी लक्ष्मी वसतिगृह समितीव्दारे जुडलेले आहेत त्यांना नविन घटनेतील सर्वसाधारण नियमावलीतील कलम डी प्रमाणे घेतलेले आहे. असे सांगून वरील पदांसाठी पुढील नावे घोषित केली.

**कार्याध्यक्ष** - श्री.शेखरजी मुंदडा, पुणे

**सचिव**- सौ.सुशिलाजी राठी, पुणे. श्री.अश्विनजी चांडक, पुणे.

**कोषाध्यक्ष** - श्री.अमोलजी भट्टड, पुणे

**उपाध्यक्ष** - श्री.बालकृष्णजी करवा, पुणे, श्री.लक्ष्मीकांतजी नावंदर, पुणे., श्री.गिरीधारीजी भुतडा, सोलापुर., सौ.मालतीजी चांडक, पुणे.

सभेने प्रस्तावित नावांवर चर्चा करून सर्व संमती दर्शविली व सर्व नवनियुक्त पदाधिका-यांचे अभिनंदन केले.
येणेप्रमाणे खालील ठराव पारित करण्यात आला.

**ठराव क्र.**३:- मंडळच्या वर्ष २०२२ ते २०२५ या कार्यकाळासाठी मंडळाचे अध्यक्ष यांनी नियुक्त केलेल्या सर्व पदाधिका-यांचे आजची सर्वसाधारण सभा अभिनंदन करत आहे.

सुचक : - श्री.विठ्ठलदासजी मनियार
अनुमोदक :- श्री.लक्ष्मीकांतजी झंवर
ठराव :- सर्वानुमते मंजुर

सभाध्यक्षांनी सांगीतले की, मंडळाचे एकुण सदस्य हे १६५४ असुन याच्यातील १५% सदस्य कार्यकारिणी सदस्य म्हणून निवडता येतील. यासाठी या सर्वसाधारण सभेमधील हजर सदस्यांना ज्यांना सदस्य होऊन तीन वर्ष झालेली आहेत. अशा सदस्यांना कार्यकारिणी सदस्य होता येईल. याव्यतिरिक्त मंडळाच्या कार्याध्यक्षांना इतर २० सदस्य निवडीचा अधिकार नविन घटनेने दिलेला आहे. यावर सभेत चर्चा करण्यात आली व खालील ठराव पारित करण्यात आला.

**ठराव क्र.**४ :- मंडळाचे एकुण १६५४ सदस्य असुन त्याच्या १५% मधील जे सदस्य आजच्या सभेत उपस्थित १५५ पैकी ज्यांना सदस्य होऊन तीन वर्ष पुर्ण झालेली आहेत. अशा सदस्यांची आजची सर्वसाधारण सभा मंडळाचे कार्यकारिणी सदस्य म्हणून निवड करत असुन याव्यतिरिक्त २० सदस्यांची निवड करण्याचे अधिकार मंडळाचे कार्याध्यक्ष श्री.शेखरजी मुंदडा यांना देत आहे.

सुचक :- श्री.मिश्रीलालजी झंवर
अनुमोदक :- श्री.सचिनजी मंत्री
ठराव :- सर्वानुमते मंजुर

यानंतर सभेत श्री.विठ्ठलशेठजी मणियार, श्री.अशोकजी राठी, श्री.गोविंदजी मुंदडा, श्री. सचिनजी भट्टड, श्री.शेखरजी मुंदडा, श्री.लक्ष्मीकांतजी झंवर यांनी आपले मनोगत व्यक्त केले.

यानंतर सभेत चर्चा करण्यात आली की, घटनप्रमाणे विश्वस्त बदलाचा अर्ज हा मा.धर्मादाय आयुक्त कार्यालयाकडे अनुसुची १ ला नोंदीसाठी दाखल करावा लागतो. येणेप्रमाणे खालील ठराव पारित करण्यात आला.

**ठराव क्र.५**:- माहेश्वरी विद्या प्रचारक मंडळाच्या विश्वस्त या पदी वर्ष २०२२-२०२५ करीता निवड करण्यात आलेल्या विश्वस्तांची नोंद मा.धर्मादाय आयुक्तांकडे करण्यात यावी. याकामी संस्थेतर्फे ॲड.डॉ.सागरजी थावरे यांची नेमणूक करण्यात आली असून यासाठीचे व त्यासंबधी लागणा-या कागदपत्रांची पुर्तता करणे, वकिलांना भेटणे, त्याचे शुल्क ठरविणे व यासाठीच्या सर्व आवश्यक कागदपत्रांवर सह्या करण्याचे तसेच कायदेशीर बांबीची पुर्तता करण्याचे व इतर प्रलंबित बदल अर्ज वा येथून पुढे होणारे बदल अर्ज दाखल करण्याचे सर्व अधिकार नवनियुक्त विश्वस्त श्री.रमेशजी धूत/ श्री.श्रीकांतजी लखोटीया यापैकी एक यांना आजची सर्वसाधारण सभा देत आहे.

सुचक :- श्री.रामप्रसादजी राठी
अनुमोदक :- श्री.राजेंद्रजी मंत्री
ठराव :- सर्वानुमते मंजुर

**विषय क्र. ७ :- मा. अध्यक्ष की अनुमतिसे अन्य विषयोंपर चर्चा एवं निर्णय ।**

सदर विषयात एकही विषय नसल्याने मंडळाचे नवनियुक्त सचिव श्री. आश्विनजी चांडक यांनी सर्वसाधारण सभेचे आभार प्रकट करून सभा संपल्याचे जाहीर केले.

**सभाध्यक्ष**